# प्रेस नोट

दिनांक - ०९/०७/२०२३

## दिनांक २७ जुलै २०२४ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

दिनांक २७ जुलै २०२४ रोजी संपुर्ण भारतात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रलंबित खटले तडजोडीने निकाली काढण्याच्या दृष्टीने मे. कोर्टाकडून वाहन चालक/मालक यांना जवळपास १०,००० समन्स काढण्यात आलेले आहेत. सदरचे समन्स हे पोलीस ठाणे व ट्राफिक ब्रँचकडून संबंधितांना बजावणी करुन शहरातील व बाहेरील व्यक्तींना लोक अदालतीपुर्वी दंडाची/तडजोडीची रक्कम भरणा करुन घेवून पुढील होणारी कायदेशीर कारवाई टाळून घेणेबाबत आवाहन पोलीसांकडून करण्यात येत आहे.

दंडाची/तडजोडीची रक्कम भरणा करुन घेणेकरीता जेलरोड पोलीस ठाणेजवळील शहर वाहतुक शाखा व पाच्छा पेठ येथील डंम्पयार्ड तसेच सोलापूर म्युनसिपल कोर्ट, नवीन पासपोर्ट ऑफिस मागे, सोलापूर शहर याठिकाणी दंड भरुन घेणेकरीता पोलीस अंमलदार यांची नियुक्ती करुन सोय करण्यात आलेली आहे. तसेच शहरात महत्त्वाचे ठिकाणी व आपणास सोयीस्कर असलेल्या जवळच्या कर्तव्यावरील वाहतुक शाखेचे ज्या पोलीस अंमलदाराकडे ई-चलान मशीन आहे, त्यांचेशी संपर्क साधून ई - चलान मशीनद्वारे दंडाची रक्कम भरणा करुन भरणा पावती हस्तगत करु शकता अन्यथा ऑनलाईनवरुन सुध्दा दंड भरु शकता. त्यानुसार दंडाची/तडजोडीची रक्कम भरणा करावी असे आवाहन याद्वारे करण्यात येत आहे. तसेच बाहेर जिल्ह्यातील समन्स असलेल्या वाहन धारक/चालक यांनी सुध्दा ऑनलाईन दंड भरण्यास हरकत नाही, त्यांनी तो दंड न भरल्यास पुढील कार्यवाही केली जाईल प्रसंगी वॉरंट काढणेबाबत मा.न्यायालयास विनंती केली जाईल.

त्याचप्रमाणे दंडाची व तडजोडीची रक्कम ऑनलाईन https://mahatrafficechallan.gov.in/ या लिंकद्वारे तसेच mahatraffic हे ॲप ॲंड्रॉयड वरुन डाऊनलोड करुन घेवून Phone pe, Google pay द्वारे तसेच QR code scan करुन भरु शकता असे अवाहन सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयातर्फ सर्व वाहन धारकांना करीत आहोत.

( यशवंत गवारी )
सहा. पोलीस आयुक्त (वाहतूक),
सोलापूर शहर

Scanned with CamScanner